महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४०० ००१. ☎-२२६२०२३१/३२

क्रमांकः- डिओअे -२०१७/तीन/1754 दिनांकः-15 SEP 2017

प्रति,

१. अधिष्ठाता, सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई.
२. अधिष्ठाता, सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई.
३. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
४. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद
५. प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय कला संस्था

विषय : <u>५८ वे महाराष्ट्र राज्यकला प्रदर्शन २०१७-१८.</u>
विद्यार्थी विभाग कलाकृती सादर करण्याबाबत.

उपरोक्त विषय संदर्भानुसार महाराष्ट्र राज्यातील शासकीय व शासनमान्य अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित कला संस्थामध्ये अध्ययन करणा-या विद्यार्थ्यांच्या कलाकृती विद्यार्थी विभागाच्या प्रदर्शनाकरिता दिनांक २८, २९, व ३० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत सर ज.जी. कला दालन, कलाशाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४०० ००१ येथे स्विकारल्या जातील. तरी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलाकृती निर्देशित तारखांना सादर करण्याची व्यवस्था करावी.

२. तसेच सादर केलेल्या कलाकृती प्रदर्शन संपल्याचे तारखेपासून दहा दिवसात परत घेऊन जाण्याची व्यवस्था करावी. अन्यथा त्याची जबाबदारी कला संचालनालयावर राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सोबत विद्यार्थी विभागाचे प्रवेश अर्ज, माहितीपत्रक सोबत जोडले असून संचालनालयाच्या या www.doa.org.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

(राजीव मिश्रा)
प्र.कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सहा. निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, औरंगाबाद/नागपूर.

यांना कळविण्यात येते की, त्यांनी आपल्या विभागतील सर्व कला संस्थांना उपरोक्त पत्रात दिलेल्या कालावधीत कला कृती सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

३) निवड नस्ती.

# ५८ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन

## माहितीपत्रक

### (विद्यार्थी विभाग)

प्रदर्शनाच्या आयोजनाच्या दृष्टीने सुलभता यावी व चित्रकला संस्थेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना विशेष व स्वतंत्र वाव मिळावा या हेतूने सन १९६९ पासून राज्य कला प्रदर्शनाचे दोन विभाग करुन (१) कला संस्थेतील विद्यार्थी व (२) व्यावसायिक कलाकार अशी दोन स्वतंत्र प्रदर्शन भरविण्याचे ठरविण्यांत आले. विद्यार्थी विभागाच्या प्रदर्शनासाठी खालीलप्रमाणे विभाग ठरविण्यात आले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) मुलभूत अभ्यासक्रम | ४) उपयोजित कला | ७) अपंग विभाग |
| २) रेखा व रंगकला | ५) कला शिक्षक प्रशिक्षण | |
| ३) शिल्पकला | ६) कला व हस्तव्यवसाय | |

या प्रदर्शनासाठी एका स्पर्धकाला एका विभागात जास्तीत जास्त दोन कलाकृती पाठविता येतील. विभाग क्रमांक १ मुलभूत अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी रु.१०००/- ची एकूण सहा बक्षिसे देण्यात येणार आहेत. विभाग क्रमांक २ ते ५ या विभागासाठी प्रत्येकी खालीलप्रमाणे पारितोषिक व गुणवत्ता प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | ... | रु.२०००/- | तृतीय पारितोषिक | ... | रु.१०००/- |
| द्वितीय पारितोषिक | ... | रु.१५००/- | चतुर्थ पारितोषिक | ... | रु.५००/- |

विभाग क्रमांक ६ मध्ये खालीलप्रमाणे पारितोषिके देण्यांत येतील :-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| धातुकाम | ... | प्रथम | रु.१०००/- | द्वितीय | रु.५००/- |
| गृहसजावट | ... | प्रथम | रु.१०००/- | द्वितीय | रु.५००/- |
| वस्त्रकला (टेक्सटाईल) | ... | प्रथम | रु.१०००/- | द्वितीय | रु.५००/- |
| मातकाम (सिरॅमिक्स व पॉटरी) | ... | प्रथम | रु.१०००/- | द्वितीय | रु.५००/- |

वरील विभाग क्रमांक ६ मधील उप-विभागात पारितोषिकपात्र कलाकृती न आढळल्यास सदर बक्षिस दुस-या विभागातील बक्षिसपात्र कलाकृती आढळल्यास तिला देण्यात येईल.

विभाग क्रमांक ७ करिता रु.२०००/- स्वतंत्र पारितोषिक देण्यात येणार आहे.

या प्रदर्शनासाठी पाठविल्या जाणा-या कलाकृती सर जमशेटजी जीजीभाई कला दालन, सर ज.जी.कलाशाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४०० ००१ येथे मुखपृष्ठात निर्दिष्ठ केलेल्या नियोजित वेळेत खालील पत्यावर व निर्धारित दिनांकानंतर स्वीकारली जाणार नाहीत.

पत्ता :- कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
कलाशाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई -४०० ००१

प्रदर्शनासाठी कलाकृतींचे आकार खालील तक्त्याप्रमाणे असावेत :-

| अ.क्र. | विषय | फ्रेमसह कमीत कमी आकार | फ्रेमसह जास्तीत जास्त आकार |
|---|---|---|---|
| १ | मुलभूत, रेखा व रंगकला आणि कला शिक्षक प्रशिक्षण | ४० सें.मी. x ३० सें.मी. | १२० सें.मी. x ९० सें.मी. |
| २ | उपयोजित कला | ४० सें.मी. x ३० सें.मी. | ७५ सें.मी. x ५० सें.मी. |
| ३ | शिल्पकला | ६ घनफुटांपेक्षा जास्त नसावा | जास्तीत जास्त वजन १०० ते १२५ किलोग्राम असावे (ही अट फक्त दगडाच्या शिल्पासाठी आहे.) |

<u>कलाकृती पाठविण्याबाबतच्या सुचना</u> :-

१) या प्रदर्शनात कला संस्थेमधून भाग घेणा-या प्रत्येक स्पर्धकाने आपल्या कलाकृती संस्था प्रमुखांमार्फत पाठविल्या पाहिजे.

२) प्रत्येक कला संस्थेने (शासकीय तथा शासनमान्य अशासकीय) कमीत कमी १० कलाकृती पाठवाव्यात अशी अपेक्षा आहे. तथापि प्रदर्शनासाठी कलाकृती निवडतांना त्यातील कला मुल्यांचा साकल्याने विचार करावा. अधिकाधिक विद्यार्थ्यांना उत्तेजन देणे या मूळ हेतूबरोबरच कला प्रदर्शनाचा दर्जा प्रस्थापित करणे हा महत्वाचा मुद्दा महाविद्यालयाच्या अध्यापकांनी नजरेसमोर ठेवावा. कला संस्थांच्या प्राचार्यांनी आपल्या कला अध्यापकांच्या सहयोगातून सुयोग्य विचारविनिमय करुन दर्जेदार कलाकृतींची निवड करावी. परीक्षण मंडळाची कसोटीस उतरलेल्या सर्व कलाकृती प्रदर्शनात मांडण्यात येणार आहेत. प्रदर्शनासाठी निवडावयाच्या कलाकृतींच्या संख्येविषयी परीक्षण मंडळावर कोणत्याही प्रकारे मर्यादा घालण्यात येणार नाहीत, याची प्रार्चायांनी नोंद घ्यावी.

३) पाठविण्यात येणारी कलाकृती ही कुठल्याही कलाकृतींची प्रतिकृती (नक्कल) अथवा अनुकरण असता कामा नये व कलाकृती ही संबंधित स्पर्धकाने तयार केली आहे असे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांनी संस्थेच्या प्राचार्याकडून घेऊन ते कलाकृतीच्या मागे व्यवस्थित चिकटवावे अशा प्रमाणपत्राशिवाय येणा-या कलाकृती प्रदर्शनासाठी स्विकारल्या जाणार नाहीत.

४) अश्लील, वादग्रस्त विषय, धार्मिक वाद निर्माण होईल असे विषय, जाती-भेदावर आधारित विषयाच्या कलाकृती प्रदर्शनासाठी स्विकारल्या जाणार नाहीत. तशा सुचना सर्व

कलाविद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी प्रत्येक संस्था प्रमुखांवर राहील याची नोंद घ्यावी.

५) कलाकृती पाठविण्यासाठी तयार केलेला तक्ता संपूर्णपणे भरुन विद्यार्थ्यांनी त्यावर त्यांच्या संस्था प्रमुखांची स्वाक्षरी घ्यावी. कलाकृतीसोबत माहिती देणारा तक्ता असल्याशिवाय त्या स्विकारल्या जाणार नाहीत.

६) तक्ता व त्यात उद्‌धृत केलेली प्रमाणपत्रे संपूर्णपणे भरुन व योग्य त्या व्यक्तींची स्वाक्षरी घेऊन कलाकृतीबरोबर पाठविण्यात यावीत.

७) पाठविण्यात येणा-या चित्रांना व्यवस्थित चौकट (फ्रेम) (माउंट) करुन पाठविण्याची व्यवस्था करावी.

८) विद्यार्थी विभागाचे प्रदर्शन राज्यातील एका ठिकाणी दाखविण्यात येणार असल्यामुळे कलाकृतींना काचेची
(फ्रेम) चौकट वापरण्यात येऊ नये,

९) प्रत्येक कलाकृतीसोबत दोन लेबल असावीत. त्यापैकी एक कलाकृतीच्या मागे चिकटविण्यात येऊन दुसरे दो-याने कलाकृतीला बांधावे.

१०) लेबलवर खालील माहिती देण्यात यावी :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव | : | .................... | | |
| | | आडनांव | नांव | वडीलाचे नांव |
| संस्थेचे नांव व संपूर्ण पत्ता | : | .................... | | |
| | | .................... | | |
| फोन नं. | | | | |
| विभाग | : | .................... | | |
| कलाकृतीचे शीर्षक | : | .................... | | |
| | | | | प्राचार्य<br>सही व शिक्का |

११) ज्या पार्सलाबाबत भाडे आकारणी पडेल अथवा अर्धवट भाडे दिलेले असते, अशी पार्सले स्वीकारली जाणार नाहीत.

१२) पाठविलेल्या कलाकृतीबाबत योग्य ती काळजी घेतली जाईल. परंतु कुठल्याही नैसर्गिक वा अन्य कारणाने नुकसान झाल्यास, अथवा हरवल्यास त्यास कला संचालनालय जबाबदार राहणार नाही. पाठविणा-याने आवश्यक वाटल्यास कलाकृतीचा विमा उतरवावा.

१३) प्रदर्शनात दाखल होणा-या कलाकृतींचे कॅटलॉग किंवा स्मरणिका किंवा इतर शासकीय प्रसिध्दी पुस्तके इत्यादींसाठी प्रतिकृती तयार करण्याचा हक्क कला संचालनालयाकडे राहील.

१४) विद्यार्थी विभागात आणून दिलेल्या कलाकृती परत घेऊन जाण्याची व्यवस्था प्रदर्शन समाप्त झाल्यानंतर १० दिवसांचे आत करावी. या मुदतीत कलाकृती नेण्याची व्यवस्था न केल्यास त्याची जबाबदारी कला संचालनालयाकडे राहणार नाही.

१५) कुठल्याही कारणासाठी प्रदर्शनाच्या मुदतीत कलाकृती परत मिळणार नाहीत. ज्या स्पर्धकांनी विद्यार्थी विभागात कलाकृती पाठविल्या असतील त्यांना व्यावसायिक कलाकारांच्या प्रदर्शनास कोणत्याही विभागात भाग घेता येणार नाही. तसे आढळल्यास अशा कलाकृती प्रदर्शन प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावरुन बाद होतील याची नोंद घ्यावी.

१६) बक्षिसपात्र व गुणवत्ता प्रमाणपत्रधारक विद्यार्थी कलाकारांना प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभास उपस्थित राहण्यासाठी व परत जाण्यासाठी ते ज्या संस्थेचे विद्यार्थी असतील त्या स्थळापासून मुख्य प्रदर्शनाच्या स्थळापर्यंत रेल्वेचे (दुस-या वर्गाचे) अथवा साध्या एस.टी. बसचे सवलतीचे भाडे (एक वेळचे बिनसलवतीचे पूर्ण भाडे) शासनातर्फे देण्यांत येईल. प्रदर्शन स्थळापर्यंत येताणाचे प्रवास भाडयाचे तिकिट जमा करणे आवश्यक आहे.

१७) प्रदर्शनासाठी निवड झालेल्या, प्रदर्शनासाठी परिक्षकांनी अंतीम पारितोषिक प्राप्त ठरविलेल्या कलाकृतीबाबतचे सर्व निर्णय हे कलासंचालक आणि प्रदर्शन समितीसह परीक्षक समितीचे असतील.

१८) अंशकालिन अभ्यासक्रमाचे विद्यार्थी तसेच जोड अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांस या प्रदर्शनात भाग घेता येणार नाही.

---------- x ----------

## महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन

विद्यार्थी विभाग

विभाग- अनुक्रमांक-
(क्र.व दि.) (प्रदर्शनाधिकाऱ्याने भरावयाचा)

प्रति,
कला संचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

महोदय,

खाली नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती मी आपणांस सादर करीत आहे.

विद्यार्थ्याचे नाव- श्री./श्रीमती/कुमारी:- ----------------------------------------------------------------------------

(मोठया अक्षरात, आडनावाने सुरवात)

विद्यार्थ्याचा संपूर्ण पत्ता व फोन नं.------------------------------------------------------------------------------------------------

ई-मेल--------------------------------------------------

| अ. क्र. | कलाकृतीचे नाव | विकावयाचे असल्यास त्याची किंमत(रु.) | स्पर्धेसाठी आहे किंवा नाही |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |

(१)माहितीपत्रकात दिलेले नियम मी वाचले असून ते मला बंधनकारक राहतील हे मी कबूल करतो.

(२)मी असे जाहीर करतो की, मी सादर केलेली कलाकृती ही कोणत्याही कलाकृतीची नककल अथवा प्रतिकृती नाही. मी आता सादर केलेल्या कलाकृतीस पूर्वी कोणत्याही प्रदर्शनात बक्षीस मिळालेले नाही.

विद्यार्थ्याची सही

(३)मी असे प्रमाणपत्र देतो की, माझ्या माहितीप्रमाणे श्री./श्रीमती/कुमारी :---------------------------------------------------------------------
यांनी प्रदर्शनासाठी दिलेली कलाकृती ही त्यांनी स्वत: तयार केलेली आहे.

कला संस्थाप्रमुखांची सही

## महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन

विद्यार्थी विभाग

विभाग क्रमांक- अनुक्रमांक-
(प्रदर्शनाधिकाऱ्याने भरावयाचा)

श्री./श्रीमती/कुमारी :----------------------------------------

यांच्याकडून राज्य कला प्रदर्शनाच्या खाली नमूद केलेल्या विभागांसाठी एकूण (  ) कलाकृती मिळाल्या.

(१)मुलभूत अभ्यासक्रम
(२)चित्रकला
(३)शिल्पकला
(४)उपयोजित कला
(५)कला शिक्षक प्रशिक्षण
(६)कला हस्तव्यवसाय
(७)अपंग विद्यार्थी विभाग

ठिकाण: मुंबई कला संचालकांकरीता,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

दिनांक-

विद्यार्थी अथवा त्याच्या अधिकृत मध्यस्थाने कलाकृती परत नेताना ही पावती दाखल केली पाहिजे.

विद्यार्थी अथवा त्याच्या अधिकृत मध्यस्थाने प्रदर्शनानंतर दहा दिवसांच्या आत कलाकृती परत नेल्या पाहिजेत.

ठराविक मुदतीत कलाकृती परत न नेल्यास तिच्या नुकसानीची जबाबदारी प्रदर्शन आयोजकांवर राहणार नाही.

[मागे पहा. . .

महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन

विद्यार्थी विभाग

नमूद केलेल्या एकंदर--------------------------------
कलाकृती राज्य कला प्रदर्शनाधिकारी यांच्याकडून मिळाल्या.

मुंबई विद्यार्थी अथवा त्याच्या
अधिकृत मध्यस्थाची सही

दिनांक-